# श्रीव्यंकटेश स्तोत्र

श्रीगणेशाय नमः ।।

श्रीव्यंकटेशाय नमः ।।

ॐ नमो जी हेरंबा । सकळादि तूं प्रारंभा ।

आठवूनि तुझी स्वरूपशोभा । वंदन भावें करीतसें ।। १ ।।

नमन माझें हंसवाहिनी । वाग्वरदे विलासिनी ।

ग्रंथ वदावया निरूपणीं । भावार्थखाणी जयामाजीं ।।२।।

नमन माझें गुरुवर्या । प्रकाशरूपा तूं स्वामिया ।

स्फूर्ति द्यावी ग्रंथ वदावया। जेणें श्रोतयां सुख वाटे ।। ३ ।।

नमन माझें संतसज्जनां । आणि योगियां मुनिजनां ।

सकळ श्रोतयां साधुजनां । नमन माझें साष्टांगीं ।। ४ ।।

ग्रंथ ऐका प्रार्थनाशतक । महादोषांसी दाहक ।

तोषूनियां वैकुंठनायक । मनोरथ पूर्ण करील ।।५।।

जयजयाजी व्यंकटरमणा । दयासागरा परिपूर्णा ।

परंज्योति प्रकाशगहना । करितों प्रार्थना श्रवण कीजे ।। ६ ।।

जननीपरी त्वां पाळिलें । पितयापरी त्वां सांभाळिलें ।

सकळ संकटांपासूनि रक्षिलें। पूर्ण दिधलें प्रेमसुख ।। ७ ।।

हें अलोलिक जरी मानावें । तरी जग हें सृजिलें आघवें ।

जनक-जननीपण स्वभावें । सहज आलें अंगासी ।। ८ ।।

दीननाथा प्रेमासाठीं । भक्त रक्षिलें संकटीं।

प्रेम दिधलें अपूर्व गोष्टी । भजनासाठीं भक्तांच्या ।।९।।

आतां परिसावी विज्ञापना । कृपाळुवा लक्ष्मीरमणा ।

मज घालोनि गर्भाधाना । अलोलिक रचना दाखविली ।। १० ।।

तुज न जाणतां झालों कष्टी । आतां दृढ तुझे पायीं घातली मिठी।

कृपाळुवा जगजेठी । अपराध पोटीं घाली माझे ।। ११ ।।

माझिया अपराधांच्या राशी । भेदोनि गेल्या गगनासी ।

दयावंता हृषीकेशी । आपुल्या ब्रीदासी सत्य करी ।। १२ ।।

पुत्राचे सहस्त्र अपराध । माता काय मानी तयांचा खेद ।

तेवीं तूं कृपाळू गोविंद । मायबाप मजलागीं ।। १३ ।।

उडदांमाजी काळेंगोरें। काय निवडावें निवडणारे ।

कुचलिया वृक्षाचीं फळें । मधुर कोठोनि असतील ।। १४ ।।

अराटीलागी मृदुता । कोठोनि असेल कृपावंता ।

पाषाणासी गुल्मलता । कैशियापरी फुटतील ।। १५ ।।

आपादमस्तकावरी अन्यायी। परी तुझे पदरीं पडिलों पाहीं ।

आतां रक्षण नाना उपायीं । करणें तुज उचित ।। १६ ।।

समर्थाचें घरींचें श्वान । त्यासी सर्वही देती मान ।

तैसा तुझा म्हणवितों दीन । हा अपमान कवणाचा ।। १७ ।।

लक्ष्मी तुझे पायांतळीं । आम्ही भिक्षेसी घालोनि झोळी ।

येणें तुझी ब्रीदावळी । कैसी राहील गोविंदा ।। १८ ।।

कुबेर तुझा भांडारी । आम्हां फिरविसी दारोदारीं।

यांत पुरुषार्थ मुरारी । काय तुजला पैं आला ।। १९ ।।

द्रौपदीसी वस्त्रें अनंता । देत होतासी भाग्यवंता ।

आम्हांलागीं कृपणता । कोठोनि आणिली गोविंदा ।। २० ।।

मावेची करूनि द्रौपदी सती । अन्नें पुरविलीं मध्यरातीं ।

ऋषीश्वरांच्या बैसल्या पंक्ती । तृप्त केल्या क्षणमात्रे ।। २१ ।।

अन्नासाठीं दाही दिशा। आम्हां फिरविसी जगदीशा ।

कृपाळुवा परमपुरुषा । करुणा कैशी तुज न ये ।। २२ ।।

अंगीकारों या शिरोमणी । तुज प्रार्थितों मधुर वचनीं ।

अंगीकार केलिया झणीं । मज हातींचें न सोडावें ।। २३ ।।

समुद्रे अंगीकारिला वडवानळ । तेणें अंतरीं होतसे विह्वळ ।

ऐसें असोनि सर्वकाळ । अंतरीं सांठविला तयानें ।। २४ ।।

कूर्में पृथ्वीचा घेतला भार । तेणें सोडिला नाहीं बडिवार ।

एवढा ब्रह्मांडगोळ थोर । त्याचा अंगीकार पैं केला ।। २५ ।।

शंकरें धरिलें हाळाहळा । तेणें नीळवर्ण झाला गळा ।

परी त्यागिलें नाहीं गोपाळा । भक्तवत्सला गोविंदा ।। २६ ।।

माझ्या अपराधांच्या परी। वर्णितां शिणली वैखरी।

दुष्ट पतित दुराचारी । अधमाहूनि अधम ।। २७ ।।

विषयासक्त मंदमति आळशी । कृपण कुव्यसनि मलिन मानसीं ।

सदा सर्वकाळ सज्जनांशीं । द्रोह करीं सर्वदा ।। २८ ।।

वचनोक्ति नाहीं मधुर । अत्यंत जनांसीं निष्ठुर ।
सकळ पामरांमाजी पामर । व्यर्थ बडिवार जगीं वाजे ।। २९ ।।
काम क्रोध मद मत्सर । हैं शरीर त्यांचें बिढार ।
कामकल्पनेसी थार । दृढ येथे केला असे ।। ३० ।।
अठरा भार वनस्पतींची लेखणी । समुद्र भरला मषीकरुनी ।
माझे अवगुण लिहितां धरणी । तरी लिहिले न जाती ।। ३१ ।।
ऐसा पतित मी खरा । परी तूं पतितपावन शाङ्‌र्गधरा ।
तुवां अंगीकार केलिया गदाधरा । कोण दोषगुण गणील ।। ३२ ।।
नीच रतली रायाशीं । तिसी कोण म्हणेल दासी ।
लोह लागतां परिसासी । पूर्वस्थिति मग कैंची ।। ३३ ।।
गांवींचे होते लेंडवोहळ । गंगेसी मिळतां गंगाजळ ।
कागविष्ठेचे झाले पिंपळ । तयांसी निंद्य कोण म्हणे ।। ३४ ।।
तैसा कुजाति मी अमंगळ। परी तुझा म्हणवितों केवळ ।
कन्या देऊनियां कुळ । मग काय विचारावें ।। ३५ ।।
जाणत असतां अपराधी नर । तरी कां केला अंगीकार ।
अंगीकारावरी अव्हेर । समर्थं न केला पाहिजे ।। ३६ ।।
धाव पाव रे गोविंदा । हातीं घेवोनिया गदा ।
करीं माझ्या कर्मांचा चेंदा । सच्चिदानंदा श्रीहरी ।। ३७ ।।
तुझिया नामाची अपरिमित शक्ति । तेथे माझीं पापें किती !
कृपाळुवा लक्ष्मीपति । बरवें चित्तीं विचारी ।। ३८।।

तुझे नाम पतितपावन। तुझें नाम कलिमलदहन।

तुझे नाम भवतारण। संकटनाशन नाम तुझें ।। ३९ ।।

आतां प्रार्थना ऐक कमळापति। तुझे नामीं राहो माझी मति।

हेंचि मागतों पुढतपुढती। परंज्योति व्यंकटेशा।। ४०।।

तूं अनंत तुझीं अनंत नामें। तयामाजी अति सुगमें।

तीं मी अल्पमति प्रेमें। स्मरूनि प्रार्थना करीतसें ।। ४१ ।।

श्रीव्यंकटेशा वासुदेवा। प्रद्युम्ना अनंता केशवा।

संकर्षणा श्रीधरा माधवा। नारायणा आदिमूर्ते ।। ४२ ।।

पद्मनाभा दामोदरा। प्रकाशगहना परात्परा।

आदिअनादि विश्वंभरा। जगदुद्धारा जगदीशा ।। ४३ ।।

कृष्णा विष्णो हृषीकेशा। अनिरुद्धा परुषोत्तमा परेशा।

नृसिंह वामन भार्गवेशा। बौद्ध कलंकी निजमूर्ति ।। ४४ ।।

अनाथरक्षका आदिपुरुषा। पूर्णब्रह्म सनातन निर्दोषा।

सकळ मंगळ मंगळाधीशा। सज्जनजीवना सुखमूर्ते ।। ४५ ।।

गुणातीता गुणज्ञा। निजबोधरूपा निमग्ना।

शुद्ध सात्त्विका सुज्ञा। गुणप्राज्ञा परमेश्वरा ।। ४६ ।।

श्रीनिधि श्रीवत्सलांछनधरा। भयकृद्भयनाशना गिरिधरा दुष्टदैत्यसंहारकरा।

वीरा सुखकरा तूं एक ।। ४७ ।।

निखिल निरंजन निर्विकारा। विवेकखाणी-वैरागरा।

मधुमुरदैत्यसंहारकरा। असुरमर्दना उग्रमूर्ते ।। ४८ ।।

शंखचक्रगदाधरा । गरुडवाहना भक्तप्रियकरा ।

गोपीमनरंजना सुखकरा । अखंडित स्वभावें ।। ४९ ।।

नाना नाटक-सूत्रधारिया । जगद्व्यापका जगद्वर्या ।

कृपासमुद्रा करुणालया । मुनिजनध्येया मूळमूर्ति ।। ५० ।।

शेषशयना सार्वभौमा । वैकुंठवासिया निरुपमा ।

भक्तकैवारिया गुणधामा । पाव आम्हां ये समयीं ।। ५१ ।।

ऐसी प्रार्थना करूनि देवीदास । अंतरीं आठविला श्रीव्यंकटेश ।

स्मरतां हृदयीं प्रकटला ईश । त्या सुखाची पार नाहीं ।। ५२ ।।

हृदयी आविर्भवली मूर्ति। त्या सुखाची अलौकिक स्थिति आपुले आपण श्रीपति ।

वाचेहातीं वदवीतसे ।। ५३ ।।

तें स्वरूप अत्यंत सुंदर । श्रोतीं श्रवण कीजे सादर ।

सांवळी तनु सुकुमार । कुंकुमाकार पादपों । । ५४ ।।

सुरेख सरळ अंगोळिका । नखें जैसीं चंद्ररेखा ।

घोटींव सुनीळ अपूर्व देखा । इंद्रनीळाचियेपरी ।। ५५ ।।

चरणीं वाळे घागरिया । वांकी वरत्या गुजरिया ।

सरळ सुंदर पोटरिया । कर्दळीस्तंभाचियेपरी ।। ५६ ।।

गुडघे मांडिया जानुस्थळ । कटितटीं किंकिणी विशाळ ।

खालतें विश्वउत्पत्तिस्थळ । वरी झळाळे सोनसळा ।। ५७ ।।

कटीवरतें नाभिस्थान । जेथोनि ब्रह्मा झाला उत्पन्न ।

उदरीं त्रिवळी शोभे गहन । त्रैलोक्य संपूर्ण जयामाजी ।। ५८ ।।

वक्ष. स्थळीं शोभे पदक । पाहोनि चंद्रमा अधोमुख ।

वैजयंती करी लखलख । विद्युल्लतेचियेपरी । । ५९ ।।

हृदयीं श्रीवत्सलांछन । भूषण मिरवी श्रीभगवान ।

तयावरतें कंठस्थान । जयासी मुनिजन अवलोकिती ।। ६० ।।

उभय बाहुदंड सरळ । नखें चंद्रापरीस तेजाळ ।

शोभती दोन्ही करकमळ । रातोत्पलाचियेपरी ।। ६१ ।।

मगनीं विराजती कंकणें । बाहुवटीं बाहुभूषणें ।

कंठीं लेइलीं आभरणें । सूर्यकिरणें उगवलीं ।। ६२ ।।

कंठावरुतें मुखकमळ । हनुवटी अत्यंत सुनीळ ।

मुखचंद्रमा अति निर्मळ । भक्तस्नेहाळ गोविंदा । । ६३ ।।

दोन्ही अधरांमाजी दंतपंक्तिजिव्हा जैसी लावण्यज्योति अधरामृतप्राप्तीची गति ।

तें सुख जाणे लक्ष्मी ।। ६४ ।।

सरळ सुंदर नासिक । जेथें पवनासि झालें सुख ।

गंडस्थळींचें तेज अधिक । लखलखीत दोहीं भागीं ।। ६५।।

त्रिभुवनींचें तेज एकवटलें । बरवेपण शिगेसी आलें ।

दोन्हीं पातयांनीं धरिलें । तेच नेत्र श्रीहरीचे ।। ६६ ।।

व्यंकटा भृकुटिया सुनीळा । कर्णद्वयाची अभिनव लीळा ।

कुंडलांच्या फांकती कळा । तो सुखसोहळा अलौकिक ।।६७।।

भाळ विशाळ सुरेख । वरती शोभे कस्तुरी टिळक ।

केश कुरळ अलोलिक । मस्तकावरी शोभती ।। ६८ ।।

मस्तकीं मुकुट आणि किरीटी । सभोंवतीं झिळमिळयांची दाटी ।

त्यावरी मयूरपिच्छांची वेटी। ऐसा जगजेठी देखिला ।। ६९।।

ऐसा तूं देवाधिदेव । गुणातीत वासुदेव ।

माझिया भक्तिस्तव । सगुणरूप झालासी ।। ७० ।।

आतां करूं तुझी पूजा । जगज्जीवना अधोक्षजा ।

आर्ष भावार्थ हा माझा । तुज अर्पण केला असे ।। ७१ ।।

करूनि पंचामृतस्नान । शुद्धोदक वरी घालून ।

तुज करूं मंगलस्नान । पुरुषसूक्ते करूनियां ।। ७२ ।।

वस्त्रे आणि यज्ञोपवीत । तुजलागीं करूं प्रीत्यर्थ ।

गंधाक्षता पुष्पें बहुत । तुजलागीं समर्पू ।। ७३ ।।

धूप दीप नैवेद्य । फल तांबूल दक्षिणा शुद्ध ।

वस्त्रे भूषणें गोमेद । पद्मरागादिकरूनि ।। ७४ ।।

भक्तवत्सला गोविंदा । ही पूजा अंगीकारावी परमानंदा ।

नमस्कारूनि पादारविंदा । मग प्रदक्षिणा आरंभिली ।। ७५ ।।

ऐसा षोडशोपचारें भगवंत । यथाविधि पूजिला हृदयांत ।

मग प्रार्थना आरंभिली बहुत । वर प्रसाद मागावया ।। ७६ ।।

जयजयाजी श्रुतिशास्त्रआगमा । जयजयाजी गुणातीत परब्रह्मा।

जयजयाजी हृदय वासिया रामा । जगदुद्धारा जगदुरो ।। ७७ ।।

जयजयाजी पंकजाक्षा । जयजयाजी कमळाधीशा ।

जयजयाजी पूर्णपरेशा । अव्यक्तव्यक्ता सुखमूर्ते ।। ७८ ।।

जयजयाजी भक्तरक्षका । जयजयाजी वैकुंठनायका ।

जयजयाजी जगत्पालका । भक्तांसी सखा तूं एक ।। ७९ ।।

जयजयाजी निरंजना । जयजयाजी परात्परगहना ।

जयजयाजी शून्यातीत निर्गुणा । परिसावी विज्ञापना एक माझी ।। ८० ।।

मजलागीं देई ऐसा वर । जेणें घडेल परोपकार ।

हेंचि मागणें साचार । वारंवार पा र्थीतसें ।। ८१ ।।

हा ग्रंथ जो पठण करी । त्यासी दुःख नसावें संसारीं।

पठणमात्रं चराचरीं। विजयी करीं जगातें ।। ८२ ।।

लग्नार्थियाचें व्हावें लग्न । धनार्थियासी व्हावें धन ।

पुत्रार्थियाचे मनोरथ पूर्ण । पुत्र देऊनि करावे ।। ८३ ।।

पुत्र विजयी आणि पंडित । शतायुषी भाग्यवंत ।

पितृसेवेसी अत्यंत रत । जयाचें चित्त सर्वकाळ ।। ८४ ।।

उदार आणि सर्वज्ञ । पुत्र देई भक्तांलागून ।

व्याधिष्ठांची पीडा हरण । तत्काळ कीजे गोविंदा ।। ८५ ।।

क्षय अपस्मार कुष्ठादिरोग । ग्रंथपठणें सरावा भोग ।

योगाभ्यासियासी योग । पठणमात्रे साधावा ।। ८६ ।।

दरिद्री व्हावा भाग्यवंत । शत्रूचा व्हावा निःपात ।

सभा व्हावी वश समस्त । ग्रंथपठणेंकरूनियां ।। ८७ ।।

विद्यार्थियासी विद्या व्हावी । युद्धीं शस्त्रे न लागावीं ।

पठणें जगांत कीर्ति व्हावी । साधु साधु म्हणोनियां ।। ८८ ।।

अंतीं व्हावें मोक्षसाधन । ऐसें प्रार्थनेसी दीजे मन ।

एवढे मागतों वरदान । कृपानिधे गोविंदा ।। ८९।।

प्रसन्न झाला व्यंकटरमण । देवीदासासी दिधलें वरदान ।

ग्रंथाक्षरीं माझें वचन । यथार्थ जाण निश्चयेसी ।। ९० ।।

ग्रंथीं धरोनि विश्वास । पठण करील रात्रंदिवस ।

त्यालागीं मी जगदीश । क्षण एक न विसंबें ।। ९१।।

इच्छा धरूनि करील पठण । त्याचें सांगतों मी प्रमाण ।

सर्व कामनेसी साधन । पठण एक मंडळ ।। ९२ ।।

पुत्रार्थियानें तीन मास । धनार्थियानें एकवीस दिवस ।

कन्यार्थियानें षण्मास । ग्रंथ आदरें वाचावा ।। ९३ ।।

। क्षय अपस्मार कुष्ठादिरोग । इत्यादि साधनें प्रयोग ।

त्यासी एक मंडळ सांग । पठणेंकरूनि कार्यसिद्धी ।। ९४ ।।

हें वाक्य माझें नेमस्त । ऐसें बोलिला श्रीभगवंत ।

साच न मानी जयाचें चित्त । त्यासी अधःपात सत्य होय ।। ९५ ।।

विश्वास धरील ग्रंथपठणीं । त्यासी कृपा करील चक्रपाणी ।

वर दिधला कृपा करूनी । अनुभवें कळों येईल ।। ९६ ।।

गजेंद्राचिया आकांतासी । कैसा पावला हृषीकेशी ।

प्रल्हादाचिया भावार्थासी । स्तंभांतूनि प्रकटला ।। ९७ ।।

व्रजासाठीं गोविंदा । गोवर्धन परमानंदा ।

उचलोनियां स्वानंदकंदा । सुखी केलें तये वेळीं ।। ९८ ।।

वत्साचेपरी भक्तांसी । मोहें पान्हावे धेनू जैसी ।

मातेच्या स्नेहतुलनेसी । त्याचपरी घडलेसे ।। ९९।।

ऐसा तूं माझा दातार । भक्तासी घालिसी कृपेची पाखर ।

हा तयाचा निर्धार । अनाथनाथ नाम तुझें ।। १०० ।।

श्रीचैतन्यकृपा अलोलिक । संतोषोनि वैकुंठनायक ।

वर दिधला अलोलिक । जेणें सुख सकळांसी ।। १०१ ।।

हा ग्रंथ लिहिता गोविंद । या वचनीं न धरावा भेद ।

हृदयीं वसे परमानंद । अनुभवसिद्ध सकळांसी ।। १०२ ।।

या ग्रंथींचा इतिहास । भावें बोलिला विष्णुदास ।

आणिक न लागती सायास । पठणमात्रे कार्यसिद्धी ।। १०३ ।।

पार्वतीस उपदेशी कैलासनायक । पूर्णानंद प्रेमसुख ।

त्याचा पार न जाणती ब्रह्मादिक। मुनि सुरवर विस्मित ।। १०४ ।।

प्रत्यक्ष प्रकटेल वनमाळी । त्रैलोक्य भजत त्रिकाळीं ।

ध्याती योगी आणि चंद्रमौळी । शेषाद्रिपर्वतीं उभा असे ।। १०५ ।।

देवीदास विनवी श्रोतयां चतुरां । प्रार्थनाशतक पठण करा ।

जावया मोक्षाचिया मंदिरा । कांहीं न लागती सायास ।। १०६।।

एकाग्रचितें एकांतीं । अनुष्ठान कीजे मध्यरातीं ।

बैसोनियां स्वस्थचित्तीं । प्रत्यक्ष मूर्ति प्रकटेल ।। १०७ ।।

तेथे देहभावासी नुरे ठाव । अवघा चतुर्भुज देव ।

त्याचे चरणीं ठेवोनि भाव। वरप्रसाद मागावा ।। १०८।।

इति श्रीदेवीदासविरचितं श्रीव्यंकटेशस्तोत्रं संपूर्णम् ।

।। श्रीव्यंकटेशार्पणमस्तु ।।

समाप्त